www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १२८ वा मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# आमदार आपल्या दारी' उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत

## पनवेल आ. प्रशांत ठाकूर यांची संकल्पना

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिंनिधी/प्रदीपपाटील**–तळोजा फेज 1 मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार 'आमदार आपल्या दारी' हा उपक्रम रविवारी संपन्न झाला. या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांनी तळोजा परिसरातील नागरीकांच्या सर्व समस्या जाणून त्यांचे निराकरण करणार असल्याची ग्वाही दिली. येत्या 3 महिन्यांनतर पुन्हा एकदा या सर्व विषयांवर आढावा घेणार तसेच येत्या 1 महिन्यांच्या आत या सर्व समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा सुरु करून नागरीकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देणार असल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबरीने नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न भाजपचे पदाधिकारी पुढाकार घेऊन सोडवतील असेही त्यांनी नागरिकांना आश्वासित केले.पनवेल महानगरपालिका आणि शासनाशी संबंधित असलेल्या विविध समस्या जाणून त्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार आपल्या दारी हा उपक्रम करण्यात आला आहे. त्यानुसार तळोजा परिसरातील नागरीकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तळोजा फेज १ सेक्टर ९ मधील उद्यानामध्ये 'आमदार आपल्या दारी' हा कार्यक्रम झाला.



यावेळी नागरीकांनी सुरक्षा, पाणी टंचाई, नदी प्रदुषण, डेब्रीज, स्ट्रीट लाइट, बस डेपो, हवा प्रदुषण, क्रिकेट ग्राऊंड, रस्ते, भाजी मार्केट, गार्डन, रस्यांवरील खड्डे, प्रॉपर्टी टॅक्स, साफ सफाई, सबवे मेंटनंस, स्पीड ब्रेकर, पाणी पुरवठा, पब्लीक हेल्थ सेंटर यासह विविध विषय नागरिकांनी मांडले. या सर्व प्रश्नांचे उत्तर देत लवकरात लवकर या सर्व समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार, तीन महिन्यांनंतर या सर्व प्रश्नांचा पुन्हा एकदा आढावा घेणार असल्याचे सांगीतले. आणि प्रत्येक महिन्यामध्ये एका शहरात आमदार आपल्या दारी हा कार्यक्रम राबवणार तसेच लेखी स्वरुपात ज्यांनी प्रश्न विचारला आहे, त्यांना १० दिवसांमध्ये उत्तर देणार असल्याची माहिती दिली. एकूणच नागरिकांच्या समस्या आणि सूचनांचा विचार करून त्यांना योग्य ते सहकार्य आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. त्यामुळे या उपक्रमाचा नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.या कार्यक्रमावेळी वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, निर्दोश केणी, संतोष पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, महिला मोर्चाच्या आशा बोसरे, ऍड. चेतन जाधव, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

# लोकशाही दिनाला आनेक विभागाच्या अधिकाऱ्यांने मारली दांडी , त्यांच्यावर काय कारवाई होणार .?

**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी** :-शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयात सोमवारी दि . २० जानेवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते . पण याठिकाणी एक ही तक्रार आली नाही, पण सर्व विभागाचे प्रमुख या लोकशाही दिना निमित आयोजीत बैठकीला येणे अपेक्षीत होते. पण काही विभागाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना तहसीलदारानी निमंत्रण देऊन ही त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत लोकशाही दिनाला दांडी मारल्याचे दिसून येत आहे .तालुक्यातील विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी या लोकशाही दिनाकडे पाठ फिरविली आहे . या लोकशाही दिनाचे आनेक विभागाच्या प्रमुखांना गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे . या गैरहजर अधिकाऱ्यां विरुद्ध तहसीलदार काय कार्यवाही करणार असे जनतेतून बोलले जात आहे . सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी अडचणींना तत्परतेने न्याय मिळण्याची शासकीय यंत्रणा म्हणजे 'लोकशाही दिन' होय. कार्यपद्धती अगदी सुलभ व्हावी यासाठी तालुकास्तरावरही दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात यावे असे जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले आहेत . त्यानुसार सोमवारी दि २० जानेवारी रोजी येथील तहसील कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते . या झालेल्या लोकशाही दिनाला तहसीलदार गोविंद पद्देवाड ,नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे तानाजी यादव , नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी दिपक भराट , गट शिक्षण अधिकारी अनिल पागे सहाय्यक विस्तार अधिकारी मंडावले , तालुका कृषी अधिकारी एल एस खताळ , गट विकास अधिकारी बी टी चव्हाण, व लि पा . उप विभाग शिरूर अनंतपाळचे मोरे जी बी , निबंध कार्यालयाचे वंसत घुले,आरोग्य विभागाचे एक कर्मचारी उपस्थित होते मात्र तहसील कार्यालयाने तालुकास्त रावरील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्या संदर्भात संबंधित कार्यालयाकडे लेखी पत्र पाठवूनही ग्रामिण रुग्णालय ,पशुवैद्यकीय विभाग ,तालुका भुमिअभिलेख, पोलिस ठाणे , महावितरण ,सार्वजनिक बांधकाम विभाग ,पाटबंधारे उपविभाग ,,भारतसंचार निगम उपविभाग ,भुतैज्ञानिक कार्यालय, लागवड अधिकारी विभाग ,वनपरीमंडळ विभाग ,महिला व बालविकास प्रकल्प विभाग ,संरक्षण अधिकारी व इतर कार्यालयाचे अधिकारी किंवा प्रतिनिधी यांनी या ' लोकशाही दिना ' कडे पाठ फिरवून उपस्थित न राहणे पसंद केले . ही अनु उपस्थीती त्यांच्या बैठकीला उपस्थित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्याच्या नोंदीवरून दिसून येत आहे .दरम्यान सोमवारी झालेल्या य लोकशाही दिनात एक ही तक्रार आली नसल्याचे दिसून येते .




### अनुपस्थित अधिकारी यांच्यावर काय कार्य होणार ?

**शिरूर अनंतपाळ येथे झालेल्या लोकशाही दिनात केवळ आठ विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते . मात्र इतर विभागाचे अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी अनुउपस्थिती दर्शवली या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार यासंदर्भात तशिलदार गोविंद पद्देवाड यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता ते म्हणाले की त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल असे ते म्हणाले.**

# योगेश्वर विद्यालय दावचवाडी येथे न्यायमूर्ती रानडे महोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक/विनोद गायकवाड**–दावचवाडी येथील न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त रानडे महोत्सव योगेश्वर विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त विश्वनाथ व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त प्रभाकर कुयटे, स्कूल कमिटी सदस्य शीला आहिरे, पंकज शिंदे, राजेंद्र शिरसाट, दिनकर कुयटे, संतोष धुमाळ पालक शिक्षक उपाध्यक्ष सुकदेव आगळे, सहसचिव गोरक्षनाथ कुयटे यांचे शुभहस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या महोत्सवांतर्गत खोखो, कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, शर्यत आदी क्रीडा स्पर्धाचे इयत्ता निहाय आयोजन करण्यात आले. दिनांक १६ जानेवारी रोजी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी नाटिकेच्या माध्यमातून न्यायमूर्ती रानडे यांचा जीवनपट उभा केला. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक अंबादास बनसोडे यांनी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे सामाजिक व आध्यात्मिक कार्य आपल्या मनोगतातून विशद केले. दिनांक १७ जानेवारी रोजी नागपूर येथील प्राध्यापक डॉक्टर तारा पाटील यांनी न्या.रानडे यांच्या जीवनावर संशोधनपर प्रबंध लिहीत असताना त्यांच्या लेखनातून अनुभवास आलेले न्यायमूर्ती रानडे स्पष्ट केले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी पोलीस उपनिरीक्षक प्रशांत ताकाटे यांनी शाळेतील जुन्या आठवणी जागवत कठोर परिश्रम शिवाय पर्याय नाही. प्रतिकूल परिस्थिती आपल्याला योग्य मार्गदर्शन करते. त्यामुळे जीवनात सकारात्मक दृष्टी ठेवून अभ्यास करा असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त विश्वनाथ व्यवहारे सर , सचिव रतन वडघुले, प्रभाकर कुयटे यांनी प्रशांत ताकाटे यांचा पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने मानचिन्ह देऊन सन्मान केला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्र व रांगोळी प्रदर्शनाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत शाबासकीची थाप दिली. दिनांक १८ जानेवारी रोजी सांस्कृतिक महोत्सव व विविध गुणदर्शन उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकधारा लावणी, लोकगीते प्रबोधन पर नाटिका, गवळणी, मूकनाटिका, एकपात्री, भारतातील विविध राज्यांचे लोकनृत्य चे विविध कलाप्रकार सादर केले. यावेळी दावचवाडी व पंचक्रोशीतील पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सूनील मोगल, संतोष बिऱ्हाडे,किसन चौधरी,अंबादास बनसोडे,रमेश वडघुले,प्रफुल्ल देवरे, सुरेश बोऱ्हाडे,निलेश शिंदे,मीनाक्षी पवार,रूपाली मते, वैशाली गवळी,शीतल देवरे, स्नेहा राक्षे, मेघना वडघुले,सीमा मैद,कैलास भगत,किशोर निफाडे आदींनी प्रयत्न केले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष बिऱ्हाडे, सुरेश बोराडे तसेच विद्यार्थी– रुद्राक्ष शिंदे, तनुजा कुयटे यांनी केले.




# पत्रकार आणि समाजसेवक संतोष शिवदास आमले यांना भीम रत्न पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे/सहसंपादक**-पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये 19 जानेवारी 2025 रोजी भीम महोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. या भिम महोत्सव चा सातचा वर्धापन दिन होता. या महोत्सव मध्ये समाजातील समाजसेवक पत्रकार आरोग्य विभागातील विशेष अधिकारी कलाकार यांच्यामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या सर्वांना भीम रत्न व कलाभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांना भिमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ साहित्यिक कवी लेखक बबन सरोदे यांच्या शुभहस्ते संतोष आमले यांचा पुरस्काराने गौरवण्यात आले. संतोष आमले हे गेले कित्येक वर्ष समाजातील तळागातील लोकांना मदतीचे कार्य करत आहे. कोविड काळामध्ये त्यांनी लोकांना अन्नधान्य औषध मोफत रिक्षा सेवा पुरविण्याचे काम केले. दुर्बल घटकातील लोकांना रिक्षा चालक स्कूल व्हॅन चालक स्कूल बस चालक यांना सतत मदत करत असतात त्यांच्या या कामगिरीमुळे पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमात समाजातील कमलाकर कांबळे ,प्रकाश गायकवाड,विजय बाबरे ,सुदिन पाटील,संतोष आमले,यांनाही भीमरत्न उरस्काराने सन्मानित करण्यात आले तर काळ क्षेत्रातील उल्लेखनीय काळ सादर करणाऱ्या प्रशांत नाक्ती,सोनाली सोनवणे ,रितेश कांबळे ,बबन सरोदे,कांचन पगारे ,प्रबुद्ध जाधव,अमोल घोडके,विशाल म्हस्कर ,प्रशांत मोहिते,रवी जाधव यांना कलाभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .यावेळी कलाकार दिग्दर्शक विशाल सावंत यांचा हि सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समिती पनवेल तालुका अध्यक्ष विजय गायकवाड, समाजसेवक तळोजे विभाग कमलाकर कांबळे,जिल्हा अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा काशिनाथ कांबळे, बौद्धाचार्य हिरामण जोशी गुरुजी, पनवेल महानगरपालिका जिल्हाध्यक्ष आरपीआय प्रभाकर कांबळे,पनवेल तालुका अध्यक्ष आरपीआय विजय पवार,समाजसेवक मोहन गायकवाड, जिल्हाध्यक्ष भीमशक्ती सामाजिक संघटना रायगड सुभाष गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य ओवळे राज सदावर्ते,उद्योजक जयवंत बाबरे, पोलीस पाटील करंजाडे कुणाल लोंढे, भीम महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीचे राहुल गायकवाड,सुदेश जाधव,वैभव गवळी,सतीश गायकवाड,शुभम रुके,मुकुंद कांबळे,कुणाल खैरे,रोशन कासारे,केवळ गायकवाड,सुरेशमोहिते,अर्जुन चिंडालिया,सुनील गायकवाड यांनी विशेष मेहनत घेतली.






==========================

# नांदेडच्या वानोळेंना आदर्श शिक्षक पुरस्कार मराठवाड्यातील अधिकाऱ्यांनी केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा विभागीय प्रतिनिधी प्रमुख/ राजु शिंदे**-सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लखनीय कार्याने परिचित नांदेडच्या गंगाधर वानोळे यांना बीडच्या मातृभूमी प्रतिष्ठानने राजमाता जिजाऊ जयंतीदिनी सुप्रसिद्ध कीर्तनकार महंत राधाताई सानप, माजी अड.आमदार उषाताई दराडे आदी मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव केला.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, धाराशिव, लातूर, परभणी, बीड या ठिकाणी एम. ए., बी.एड., बी.एस.एल., एलएल.बी. सारखे उच्च शिक्षण घेऊन बीड व जालना जिल्ह्यात वानोळे यांनी शैक्षणिक योगदान तर नांदेड, बीड, परभणी व जालना जिल्ह्यात सामाजिक योगदान दिले असून आदिवासी समाजाचे समन्वयक तथा समाज संघटक म्हणून ते मराठवाड्यात परिचित आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना नुकताच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आल्याने जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर,मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार,डॉ. किशोर कोठूळे, डॉ.राजू वागतकर, डॉ.शिवाजी खंदारे, डॉ.प्रकाश बुलबुले, डॉ. यादोजी भिसे, डॉ. सोपान वागतकर,पीएसआय गोपाळ सूर्यवंशी, पोस्ट ऑफिसर गफार शेख,माधव जाधव, बाबसाहेब तिकटे, अंतेश्वर मंदाडे, चंद्रकांत वाडकर, दिगंबर टिळे, ज्ञानेश्वर डोईफोडे, सुसेन सुरवसे,कुलदीप नंदुरकर,देविदास येंचेवाड, किशोर शिंदे, आत्माराम सूर्यवंशी, तुषार अन्नमवार, सुचिता बोंबडे, विनिता उरगुंडे, केतन विरकर, दशरथ राठोड यांच्यासह अधिकारी, मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले असून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील सर्वांचे आणि मातृभूमी प्रतिष्ठानचे गंगाधर वानोळे यांनी आभार मानले आहेत.






## संजय रॉयच्या शिक्षेची सुनावणी आज

**कोलकात्ता :** कोलकात्यामधील सरकारी आर. जी. कर वैद्याकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणात मुख्य आरोपी संजय रॉय याला सियालदह न्यायालयाने दोषी ठरवले. त्याच्या शिक्षेची सुनावणी सोमवारी होणार आहे.

याप्रकरणी सोमवारी दुपारी १२.३० वाजता रॉयची बाजू ऐकून घेतली जाईल, तसेच त्याच दिवशी त्याला शिक्षा सुनावली जाईल असे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिर्बन दास यांनी स्पष्ट केले.

रॉय याला न्यायालयाने भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४अंतर्गत बलात्कारासाठी आणि कलम ६६ व १०३(१)अंतर्गत हत्या व मृत्यूसाठी दोषी ठरवण्यात आले. न्यायाधीशांनी सांगितले की रॉय डॉक्टरवर बलात्कार केल्याबद्दल आणि तिचा गळा आवळून हत्या केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळले आहे. सीबीआयने त्याच्यावर ठेवलेले सर्व आरोप सिद्ध झाले आहेत.

# देशमुख हत्येच्या निषेधार्थ हजारोंचा जनआक्रोश मोर्चा

**छत्रपती संभाजीनगर :** संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ छत्रपती संभाजीनगरमधील क्रांतीचौक ते विभागीय आयुक्त कार्यालयासमोर रविवारी निघालेल्या जनआक्रोश मोर्चात नागरिकांचा संताप पाहायला मिळाला. यावेळी या दोघांना न्याय मिळाला पाहिजे, तसेच मृतांच्या आरोपींनी फासावर लटकवा, अशा मागण्या करणारे फलक घेऊन लोक रस्त्यावर उतरले होते.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची घटना घडल्यानंतर परभणीत सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला होता. अद्याप या दोन्ही घटनांतील आरोपींना शिक्षा सुनावण्यात आलेली नाही. त्यामुळे रविवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वपक्षीय आणि सर्वधर्मीय जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

दुपारी १२.३० वाजता सुरू झालेल्या या मोर्चात मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील, संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, मुलगी वैभवी आणि मुलगा विराज तसेच सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील प्रेमनाथ, सायली आणि दिगंबर विटेकर, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

यावेळी दोन्ही घटनांतील आरोपींना तातडीने अटक करावी आणि दोषींना फासावर लटकविण्यात यावे, अशी मागणी पुन्हा एकदा करण्यात आली. "लढा फक्त माणुसकीचा, ना पक्ष ना जात-पात केवळ अन्यायावर आघात, संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवा, या दोघांना न्याय मिळालाच पाहिजे,' असे फलक आंदोलकांच्या हातात होते.



## गाझात शस्त्रसंधी लागू

**तेल अवीव :** गाझा शस्त्रसंधीनंतर 'हमास'ने तीन अपहृत महिलांची नावे जाहीर केली. रोमी गोनेन, एमिली दमारी आणि डोरोन स्टीनब्रेचर यांची सुटका केली आहे, असे 'हमास'ने जाहीर केले.

इस्त्रायलने सांगितले की, गाझा युद्धात स्थानीय वेळेनुसार, सकाळी ११.१५ वाजता शस्त्रसंधी सुरू झाली. मात्र, ही शस्त्रसंधी सकाळी ८.३० वाजता सुरू व्हायला हवी होती. 'हमास'ने अपहृत नागरिकांची यादी देण्यास तीन तास विलंब केला आहे.

शस्त्रसंधी लागू झाल्यानंतर युद्धक्षेत्रावर आनंदाचे वातावरण पसरले आहे. काही पॅलेस्टिनी नागरिक आपल्या घरी परतू लागले आहेत.

**गाझावर इस्त्रायली सैन्याचे हल्ले**

'हमास'कडून शस्त्रसंधीस विलंब होत असल्याने इस्त्रायलने सकाळी गाझा पट्टीवर हल्ले सुरूच ठेवले. इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात गाझा पट्टीत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. इस्त्रायल सैन्यदलाचे प्रमुख प्रवक्ते डॅनियल हेगरी म्हणाले की, जोवर तीन अपहृत नागरिकांची यादी इस्त्रायलकडे सोपवत नाही. तोपर्यंत शस्त्रसंधी लागू होणार नाही.



**भारताचा दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा लग्नबंधनात अडकला आहे. त्याच्या पत्नीचे नाव हिमानी आहे, नीरजने सोशल मीडियावरून जाहीर केले. नीरजचे लग्न झाल्यानंतर त्याच्या चाहत्यांना आश्चर्याचा धक्काच बसला आहे.**

## बिहारमध्ये दारू प्यायल्याने सहा जणांचा मृत्यू

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीचे पडघम सुरु असताना अवैध दारू प्यायल्याने सहा जणांचा मृत्यू झाला आहे. यावर पांघरूण घालण्यासाठी सहाही जणांचे मृतदेह प्रशासनाला न कळविताच जाळून टाकण्यात आले आहेत.

पश्चिम चंपारणच्या बेतियामध्ये ही घटना घडली आहे. या सर्वांनी विषारी दारूचे सेवन केले होते. प्रशासनाने अद्याप दारूमुळे या लोकांना मृत्यू झाल्याचे जाहीर केलेल नाही.

### प्रकरण दडपण्यासाठी मृतदेह जाळले

सर्व मृत हे मठिया या एकाच गावातील आहेत. लौरिया पोलिस स्टेशन हद्दीतील मठिया गावात ३५ वर्षीय प्रदीप गुप्ता यांचा गुरुवारी संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर शनिवारी काही तासांतच एकामागून एक आणखी पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये काका आणि पुतण्यांचाही समावेश आहे. कुटुंबातील सदस्यांनी घाईघाईत मृतदेहांवर अंत्यसंस्कार केल्याचे सांगण्यात येत आहे. कुटुंबाने याबद्दल पोलिसांना माहिती दिली नाही. एसडीएम सूर्यप्रकाश गुप्ता यांनी ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दम्यामुळे दोन लोकांचा मृत्यू झाला. त्यापैकी एकाचा अर्धांगवायूमुळे मृत्यू झाला. थंडीमुळे तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

# अंगणवाडी सेविकांचे मानधन वाढी साठी लढा देणाऱ्या राज्य सचिवाचा सत्कार

## अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीचा लढा सुरूच राहील : राजेश भैया राज्य सचिव

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर . रिसोड/रणजितसिह ठाकुर/ रिसोडः** अंगणवाडी कर्मचारी अगदी तुटपुंज्या मानधावर चोवीस तास आऑन ड्युटी काम करतात .वारवांर अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या वतिने आंदोलन, संप मोर्चा द्वारे शासनाकडे मान वाढीसाठी मागणी करत असतात. या संघटनेच्या दीर्घ चाललेल्या संपाला दाद देवुन काही अंशी मागण्या शासनानाने मान्य करून मानधनात वाढ केली अंगणवाडी कर्मचारी संघटनेकडून शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करणारे .विविध मागण्यांची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ ठाणे रिसोड तालुका अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी मानधन वाढ झाल्याबद्दल आनंद मेळावा



आयोजित केला होता आनंद मेळाव्याचे सत्कारमूर्ती महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाचे संघटक सचिव राजेश भैय्या , यांनी सत्कारप्रसंगी सांगितले कि जो पर्यंत अंगणवाडी कर्मचाऱ्याना ,राज्य कर्मचाऱ्याचा दर्जा मिळुन स्केल वेतन श्रेणी मिळणार नाही तो पर्यंत हा लढा सुरूच राहील. एवढ्या मानधनावर आपण समाधानी नाही. जिल्ह्यातील जिल्ह्याच्या अध्यक्ष विजया सांगळे ताई ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे देवथळे सर लीला ताई काळे ,प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मानवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला वाशिम जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकला तायडे रिसोड तालुकाध्यक्ष सुलभा पत्की शहरी रिसोड तालुका अध्यक्ष आम्रपाली पठाडे तसेच इतर प्रमुख मंगल काळे आशा चव्हाण शारदा बुरसे झडपे ताई सिंधू रोडगे वर्षा बुंदे रेखा जाधव सुनीता चोपडे कौशल्या फुलसावंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शारदा बुरसे तर आभार सुलभा पतकी यांनी मानले

==================

## अंभोरा पोलिसांच्या कामगिरीचे पोलीस अधीक्षकांकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**

**बाळासाहेब रकटाटे/आष्टी प्रतिनिधी**–बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील वाहीरा येथील दुहेरी हत्याकांडातील आठ आरोपींना अवघ्या काही तासांत जेरबंद करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक यांनी पोलीस ठाण्याला भेट देऊन विशेष कौतुक केले असून लवकरच प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांगितले.आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत गुरूवारी रात्रीच्या दरम्यान दुहेरी हत्याकांड झाल्याची घटना घडली होती. या घटनेतील आठ आरोपींना ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे व त्याच्या टीमने मोठ्या शिताफीने पाठलाग करून अटक केली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता प्रकरण व्यवस्थित हातळल्याने बीडचे पोलीस अधीक्षक नवनवीन कॉवत यांनी शनिवारी दुपारी अंभोरा पोलिस ठाण्याला भेट देऊन विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व पोलिसांचे कौतुक केले. त्याच बरोबर लवकरच प्रशस्तीपत्र देण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे, पोलीस हवालदार, पोलीस अंमलदार उपस्थित होते.

## एकता मराठी साहित्य संमेलनात रंगले बालगोपाळांचे कथाकथन

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/वि.भा.साळुंके सत्राचे**-एकता फाउंडेशन शिरूर कासार (महाराष्ट्र राज्य), साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सातवे एकता मराठी साहित्य संमेलन दहिवडीतील महात्मा फुले विद्यालयात प्राचार्या डॉ. दिपाताई क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात नुकतेच पार पडले. संमेलनाच्या दुसर्या दिवशी (१८ जानेवारी) दुपारी ११:३० ते १ यावेळेत कडा ता. आष्टी येथील सुप्रसिद्ध कथाकार तथा निवेदक वि. भा. साळंके यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन संपन्न झाले. यशवंत होळकर विद्यालयाची विद्यार्थीनी सानिका गुजर हिने 'चिमटा' ही आई व मुलाच्या गहिया नात्यावर प्रकाश टाकणारी कथा सांगून उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले. होळकर विद्यालयाची कु. संध्या नेटके हिने 'बाप' ही वेगळ्या धाटणीची कथा सादर करून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले. याच विद्यालयाची कु. कार्तिकी नेटके हिच्या 'स्पर्धा' या सत्यकथेने प्रेक्षकांना भारावून टाकले. 'कष्ट' ही कथा सादर करून दहिफळे वस्ती शाळेची विद्यार्थीनी ऋतुजाकेदार हिने सर्वांना मंत्रमुग्ध केले. याच शाळेची विद्यार्थीनी भार्गवी तुपे हिने 'मोबाईल' ही मोबाईलच्या दुष्परिणामांवर आधारित कथा पेश करून चांगला संदेश दिला. कार्तिकी अनाप हिने 'पर्यावरण' ही सध्याच्या ज्वलंत सामाजिक विषयावरील कथा सादर करत रसिकांना भविष्यातील धोक्यांची जाणीव करून दिली. दहिफळे वस्ती शाळेचाच विद्यार्थी शिवम मानूरकर याची 'व्यथा' ही भावगर्भ कथा ऐकून सभामंडप भारावून गेला तर भागवत बडे या 'कृतज्ञता' ही कथा सादर करून वातावरणात गंभीरता आणली. यावेळी संमेलनाध्यक्षा प्राचार्या डॉ. दिपाताई क्षीरसागर, एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प. संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, संमेलनाच्या स्वागताध्यक्षा तथा एकताच्या सल्लागार एड. भाग्यश्री ढाकणे, महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य बाबुराव जायभाये, जगदीश चेमटे, डॉ. बाळासाहेब सानप, फौजी कैलास खेडकर, देवीदास शिंदे यांनी श्रोत्यांमध्ये बसून कथाकथन सत्राचा आनंद घेतला. मुलांच्या कथाकथनावर खुश होत संमेलनाध्यक्षा डॉ. क्षीरसागर यांनी प्रत्येक बालकथाकाराला रोख बक्षीसही दिले.

=======================




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या आहीर नोटीसन कळविण्यात येते की, श्रीमती विमल जगन्नाथ पाटील, संपर्क पत्ता कोप्रोली तालुका उरण, जिल्हा रायगड हिच्या मालकी, तावेकबजा, वहिवाटीतील खालील परिशिष्टात नमुद केलेल्या तीन जमीन मिळकती आहेत. सदर मिळकती विक्री करणेचे ठरविले आहे.

**मौजे कोप्रोली, तालुका-उरण, जिल्हा रायगड**

| भूमापन क्रमांक | उपविभाग | ULPIN | क्षेत्र है. आर | आकार |
|---|---|---|---|---|
| 29 | 2 | 27402240353 | 0-07-10<br>पो. ख 0-01-00<br>--------<br>एकूण 0-08-10 | 1-72 |
| 29 | 4-व | 35500586064 | 0-02-00<br>पो. ख 0-00-50<br>--------<br>एकूण 0-02-50 | 0-9 |
| 29 | 6 | 11576057423 | 0-07-10<br>पो. ख 0-01-00<br>--------<br>एकूण 0-08-10 | 1-62 |

तरी वर नमुद्र तीन जमीन मिळकतीबाबत येथे नमुद तीन जमीन मिळकतीचे मालक यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचेही गहाण, दान, बोजा, संमततेपत्र, वचनचिठठी, साठेकरार, सामंजस्य करार, समझोताकरार, खरेदीखत ट्रस्ट डीड, पोटगी, वारसा अदलाबदली, हक्कसोडपत्र, भाडेपटटा, वहिवाट, अन्य कोणताही करार-मदार इत्यादी कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, इतर हक्क अधिकार, ताबाबकबजा, वहिवाट इत्यादी अत्तल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी कानदोपत्री पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 14 (चौदा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे तसेच समक्ष माझे वकील ॲड. चेतन मनोहर भोईर यांचेकडे अथवा त्यांच्या खाली नमुद पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी हरकत न आल्यास सदर तीन अमीन मिळकती, निर्वेध बोजारहित आहेत सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत नाही किंवा हरकत असल्यास त्यांनी सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल सदर जमीन मिळकतीबाबतचा विक्री व्यवहार पूर्ण करतील. सदर वर नमुद केलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाहीत याची सर्वांनी स्पष्ट नींद घ्यावी.

**तारीख 20/01/2025**

**सही-**
**ॲड. चेतन मनोहर भोईर**
**रा. नवघर पो. ज एन पी टी**
**तालुका उरण नवी मुंबई मोबाईल नंबर ९९३०४७७३०२**

# दिशा व्यासपीठ कामोठे व कामोठे पोलीस स्टेशन याचा संयुक्त मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर-**"कामोठे व कामोठे परिसरातील विद्यार्थी तसेच पालक यांना प्रबोधन करण्यासाठी एक जानेवारी 2024 पासून दिशा व्यासपीठ कामोठे व कामोठे पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विचाराने शाळा तसेच समाजातील विविध संस्था, काही राबविण्यात येणारे कार्यक्रम अशी ठिकाणे शोधून समाजात प्रबोधन करण्याचे कार्य करण्यात आले.सदर कार्यात कामोठे पोलीस अधिकारी कर्मचारी तसेच समाजातील वकील व जाणकार प्रतिष्ठित यांच्यामार्फत ने लेक्चर व त्यांचे अनुभव या माध्यमातून सध्याची भावी पिढी यांना मार्गदर्शन केले यामध्ये 1)मोबाईलच्या विळख्यात अडकलेला विदयार्थीवर्ग, २)सायबर क्राईम" सायबर फ्रॉड व्हाट्सअप फेसबुक द्वारे होणारे रोड व त्यामध्ये बरबाद होणारी तरुण पिढी ३)मुलींवरील अत्याचार व घ्यावयाची खबरदारी, यामध्ये शाळेतील मुलींना गुड टच व बॅड टच बाबत दिलेली माहिती 4)अमली पदार्थ विरोधी जनजागृतीचे अभियान इत्यादी विविध विषयाद्वारे कामोठे येथे राबवत आहेत. दिशा सामाजिक संस्था व कामोठे पोलीस स्टेशन यांच्या सहकार्याने वर्षाच्या पहिल्या दिवसापासून हे अभियान शालेय विद्यार्थ्यांसाठी राबवत आहेत.आतापर्यंत जवळपास चौदा शाळांमध्ये अशा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, सहा हजाराच्या आसपास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.सोशल मीडियाच्या वापराविषयी जागरूकता, मोबाइलचा सकारात्मक व नकारात्मक वापर व त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा दुष्परिणाम व प्रभाव, ऑनलाईन फसवणूक सायबर सुरक्षा, सायबर गुन्हा व प्रकार, मानसिक आरोग्य जागरूकता अभियान, मुला -मुलींच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या मार्गदर्शक सूचना तसेच शारीरिक बदलामुळे होणारे परिणाम, आणि अमली पदार्थ विरोधी जनजागृती तसेच



सोशल मीडिया च्या गैरवापरामुळे सायबर गुन्हेगारी किंवा सायबर जागरूकता या विद्यार्थामध्ये कशी पसरवली जाऊ शकते, याबाबत विविध उदाहरणे देऊन जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जेणेकरून ते आगामी भविष्यात एक चांगले आणि जबाबदार नागरिक बनू शकतील यावर सेशन घेण्यात आले. सकारात्मक प्रतिसादात एकंदरीत हे अभियान अतिशय यशस्वीरीत्या संपन्न झाले. यावेळी कामोठे पोलीस स्टेशन मधून वरिष्ठ पोलीस निरीक्षक कामोठे सन्माननीय विमल बिडवे मॅडम, वशिष्ठ कागणे पोलीस उपनिरीक्षक,कामोठे पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत सर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अरविंद मसलकर सर,महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका खरटमल मॅडम, दिगंबर होडगे सर तसेच युवा व्याख्याते ॲड विवेक भोपी व डॉ. कल्याणी पात्रा, युवा व्याख्याते सुजित काळंगे, शैलेश कोंडसकर, पी. एल. व्ही. पनवेल जिल्हा न्यायालय, ॲड सिद्धार्थ इंगळे,लेखक पंकज सूर्यवंशी,ॲड विकी दुशिंग,सिए कुमार बोडके,ॲड जय पावणेकर, नाना पडाळकर,किरण शिंदे या वक्त्यांनी तसेच दिशा व्यासपीठाच्या संस्थापक निलम आंधळे व उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी मार्गदर्शन केले.विदयार्थ्यांचे भविष्यात होणारे नुकसान, विद्यार्थी वर्ग नशेमध्ये गुंतत चालला आहे त्याचे परिणाम काय होतात व ते कसे टाळता येईल त्याबाबत नेमकी काय खबरदारी घ्यावी याच्या टिप्स देखील या अभियानात देण्यात आल्या,याशिवाय विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांना देखील उत्तर देण्यात आली.यापुढेही शाळा, कॉलेज, सामाजिक संस्था तसेच गृहनिर्माण सोसायटीमध्ये देखील अशा कार्यशाळा घेण्यात येणार आहेत.



**दैनिक युवक आधार,-** राज्य मराठी पत्रकार परिषद आंबेगाव ता.अध्यक्ष,उपाध्यक्ष संपर्क प्रमुख, खजिनदार व दैनिक अधिकारनामा चे सर्व पत्रकार आंबेगाव तालुक्यातील सर्व अधिकारी यांना दीनदर्षिका वाटप.आंबेगाव.पुणे.दि 20 जानेवारी रोजी आंबेगाव तालुका या ठिकाणी राज्य मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रविण(पप्पू)शिंदे व दैनिक अधिकारनामा पत्रकार, खेड,आंबेगाव जुन्नर तालुका संपर्क प्रमुख गणेश वाळुंज,अधिकारनामा पत्रकार, उपाध्यक्ष दत्ता नेटके, अधिकारनामा पत्रकार,संतोष माठे खजिनदार,अधिकारनामा पत्रकार,राजेश भोर सचिव,नितीन खरात संपर्क प्रमुख याच्या हस्ते मा. Api किरण भालेराव साहेब, मा. नायब तहसील दार किर्वे साहेब,गट विकास अधिकारी प्रमिला मॅडम, यांच्या कार्यालयात दीनदर्षिका देण्यात आले.

# पटेल ज्वेलर्स उरण शाखेकडून हळदीकुंकू समारंभ उत्साहात साजरा

दैनिक युवक आधार
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**–मकर संक्रातीपासून रथसप्तमीपर्यंत सुरू असणारे हळदीकुंकू म्हणजे महिलांसाठी वेगळीच पर्वणी असते. हळदी कुंकू म्हणजे धार्मिकते सोबतच एकमेकींविषयी बांधिलकी जपणारा ,स्नेह वाढविणारा असा हा समारंभ आहे. ग्रामीण भागात किंवा शहरी घरगुती , सोसायटी,सामाजिक मंडळ, राजकीय व्यासपीठ अशा सर्व ठिकाणी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. पूर्वीच्या काळी शेतीच्या कामात तसेच नेहमीच्या राम रगाड्यात अडकलेल्या महिलांकरता हळदीकुंकू म्हणजे एक विरंगुळा असायचा, आजकाल नोकरी व्यवसाय निमित्त महिला धकाधकीचे जीवन जगत आहेत त्यांच्यासाठीही हा समारंभ एक विरंगुळा ठरत आहे श्रमपरिहार होत आहे. आपले व्यावसायिक संबंध जोपासण्यासाठी , ग्राहकांसोबत ऋणानुबंध राखण्यासाठी शॉपिंग सेंटर, मॉल मध्ये ही हळदीकुंकू समारंभ साजरे होत आहेत. धार्मिकता व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी पटेल ज्वेलर्स उरण शाखे तर्फे हि उरणमधील महिलांसाठी भव्य स्वरूपात शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी श्रीराम मंदिरात हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. पटेल ज्वेलर्स या व्यावसायिक उद्योगाची सुरूवात १९९२ रोजी पनवेलचा "जवेरी बाजार "अशी ओळख असलेल्या जोशी आळीत एका छोट्याशा दुकानात झाली."विश्वास हीच परंपरा "हे ब्रीदवाक्य असलेल्या ब्रँड ने काही वर्षातच ग्राहकांचा विश्वास जिंकण्यात यश मिळवले.श्री मगनभाई पटेल ,श्री प्रफुल पटेल व श्री नवनीत पटेल यांनी १९९२ मध्ये पनवेल मध्ये १५० चौरस फुटाच्या दुकानांमध्ये पटेल ज्वेलर्स या नावाने दुकान सुरू करुन एवढेसे रोप लावले.पण आज पटेल बंधूंचे ग्राहकांशी अदबशीर, आदराने बोलणे, सेवेतील तत्परता, सोन्याची शुद्धता, व्यवहारातील पारदर्शकता या वैशिष्ट्यामुळे आज पटेल ज्वेलर्स नाव आपल्या व्यवसायात प्रसिद्ध होवून नावलौकिक कमावले आहे. त्यामुळे ग्राहकांचा पावले आपोआप या दुकानाकडे वळत आहेत. दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढल्याने जागाही अपुरी पडत असल्याने दुकानाचा विस्तारा करिता आता या दुकानाचे भव्य शोरूम मध्ये रूपांतर झाले आहे.पहिला मजला हा ७ हजार फुटांमधे अत्याधुनिक सुविधांसह विस्तारला आहे. पनवेल रायगड व नवी मुंबई वासियांसाठी भव्य असे शोरूम खुले केले आहेत. आणि आता दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या विस्तार होत आहे. व या जागेत मोठ्या शोरूमचे काम चालू असून लवकरच १२ हजार फुटाचे शोरूम ग्राहकांसाठी खुले करण्यात येणार आहे .पनवेलचे पटेल ज्वेलर्सच्या शाखा महाड ,माणगाव , अलिबाग पेण, रोहा ,उरण, रायगड,



नवी मुंबई ,तळोजा, कल्याण, ठाणे ,डोंबिवली पर्यंत प्रसिद्ध असून ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. खरेदीसाठी गर्दी होत आहे. दिनांक १८ जानेवारी रोजी पटेल ज्वेलर्स उरण शाखेतर्फे आयोजित केलेल्या भव्य हळदी कुंक समारंभात उरण व उरण च्या आजुबाजूच्या गावांतून आलेल्या महिलांनी या कार्यक्रमास प्रचंड प्रतिसाद दिला. फक्त हळदीकुंकू च नाही तर महिलांसाठी छोटे छोटे खेळ खेळले गेले. या खेळातही सहभागी होऊन महिला वर्गाने आनंद घेतला. तसेच खेळात विजयी झालेल्या महिलांना आकर्षक बक्षीस देऊन गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे हळदीकुंकू साठी आलेल्या महिलांना आकर्षक भेटवस्तू सौभाग्याचे लेण नथ देण्यात आली व नाष्टा देण्यात आला सोबत तीळगूळ देण्यात आले. पटेल ज्वेलर्स कडून आयोजित केलेला हळदीकुंकू समारंभ यशस्वी व रंगतदार होण्यासाठी जनरल मॅनेजर प्रतीक्षा डायस यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच पटेल ज्वेलर्स संपूर्ण टिम यांच्या मेहतीने व प्रतीक्षा डायस मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुंदररीत्या व सुरळीत पार पडला. सुमारे ३५० हुन अधिक संख्येने महिला वर्ग या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

# धार्मिकः– शनी देवस्थान वाहनतळ प्रवेशद्वाराचे काम पूर्णत्वाकडे

**भक्तांसाठी स्वयंचलित बॅरियर** **फास्टॅग अन् थेट मुख्य दर्शनरांगेत मिळेल प्रवेश**



दैनिक युवक आधार
**नेवासा वार्ताहर/लखन वाल्हेकर**– शनिशिंगणापूरातील वाहनतळ प्रवेशद्वार कमानीचे काम पूर्णत्वाकडे गेल्याने शनिभक्तांची वाहने शिंगणापूरात आल्यानंतर आता या कमानीतून देवस्थानच्या वाहन तळावर तर भाविकही थेट मुख्य दर्शन रांगेत जावू शकणार आहेत. 24लाख रू खर्चाचे हे प्रवेशद्वार असून ते भाविकांच्या सोयीसाठी देवस्थान कडून बांधण्यात आले आहे.येत्या आठवड्यात हे काम पूर्ण होणार आहे. शनिशिंगणापूरला देशभरातून सतत भाविकांचा ओढा असतो. परंतु भाविकांना वाहने कुठे पार्क करावीत, मुख्य दर्शन रांगेत कुठून जावे याचा अनेकदा संभ्रम पडत असतो मात्र आता भाविकांना देवस्थानचे वाहनतळ ठळकपणे तर दृष्टीस पडणारच आहे शिवाय भाविकांना, शनिभक्तांना आता वाहनतळातून थेट मुख्य दर्शन भुयारी रांगेत सहजपणे जाता येणार आहे. त्यासाठी देवस्थान कडून वाहनतळ प्रवेशद्वार बांधण्यात आले असून ते आठवडा भरात पूर्ण होणार आहे. हे वाहनतळ प्रवेशद्वार दहा नग आर सी सी कॉलमचे असून प्रवेशद्वारातून वाहने ये –जा करण्यासाठी दोन स्वतंत्र गेट असणार आहेत तर मध्यभागी सुरक्षा व्यवस्था केबीन असणार आहे. प्रवेशद्वारावर दगडाच्या घडीव कॉलम प्रमाणे नक्षीदार अशी डिझाईन, स्लबवर नक्षीदार छज्जा, रेलिंग डिझाईन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या प्रवेशद्वारात स्वयंचलीत ब्यारियर व फासट्याग सुविधाही असणार आहे. या प्रवेशद्वाराचे लाईट फिटिंग व कलरिंग काम या आठवड्यात पूर्ण होणार आहे.शिंगणापूरात भाविकांचे वाहन आले की लगेचच हे भव्य प्रवेशद्वार भाविकांच्या दृष्टीस पडणार आहे. दूर वरून आलेल्या भाविकांसाठी हे प्रवेशद्वार मार्गदर्शक ठरणार आहे. येथून दर्शन रांग, प्रसादालय, मुख्य रस्ता, प्रशस्त अल्पदरात भाविकांना पार्किंग व्यवस्था मिळणार आहे. भाविकांसाठी दर्शन रांगेत ये –जा करण्यासाठी दोन भुयारी दर्शन मार्ग तर आहेतच शिवाय पानसतीर्थ सुशोभीकरण प्रकल्पही प्रथम दृष्टीस पडणार आहे असे देवस्थानचे सहायक कार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांनी सांगितले. हे प्रवेशद्वार बांधकाम व त्यावरील डिझाईन साठी राज्याबाहेरील कला कुसर कारागीर बोलावण्यात आलेले होते. प्रवेशद्वारावरील कोरीव कला कुसरही बघण्यासारखी आहे. देवस्थानचे वाहनतळ वमंदिर मुख्य दर्शन मार्ग भाविकांना या प्रवेशद्वारामुळे सहज दिसेल असे शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष भागवत बानकर यांनी सांगितले.

=====================

# उरण चारफाटा येथे सिडकोच्या अतिक्रमण विभागाची कारवाई

दैनिक युवक आधार
**महाराष्ट्र प्रतिंनिधी/प्रदीप पाटील**–आज सकाळी 11 वाजल्यापासून उरण चारफाटा येथे असलेल्या अनधिकृत टपरी धारकांवर सिडकोच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने कारवाई करण्यात आली.यावेळी अतिक्रमण विभाग पोलीस व कर्मचाऱ्यांच्या फोज घेऊन तीन जेसीबीच्या साह्याने कारवाईस सुरुवात केली. यामध्ये फेरीवाल्यांच्या हातगाडी व टपरी यावर कारवाई करून त्या जमीनदोस्त करण्यात आली.आज जरी सिडको अतिक्रमण विभागाने कारवाई केली असली तरी काही तासांतच पुन्हा जैसे थे रस्त्यावर फेरीवाल्यांचे बस्तान बसल्याचे चित्र अनेकवेळा पहावयास मिळत आहे.सिडको अतिक्रमण विभाग कारवाई करताना लाखो रुपये खर्च करूनही पुन्हा पुन्हा अनधिकृत फेरीवाले बस्तान मांडत आहेत. तरी सिडकोने कारवाई केल्यानंतर पुन्हा त्याठिकाणी अनधिकृत साम्राज्य उभे राहू नये याकडे लक्ष देणे आवश्यक बनले आहे. अन्यथा कारवाईच्या नावाखाली अनेकवेळा लाखों रुपये पाण्यात जाऊन वारंवार कारवाईचा बडगा उगारावा लागेल.



# टी वाय बी एस सी बॅच चे तब्बल 24 वर्षानंतर स्नेहमिलन

दैनिक युवक आधार
**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड**– जीवनात खरा आनंद कोणता असेल तर तो आपल्या मित्राच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे इतरांच्या सुख दुःखात सहभागी होऊन संकट समयी आपल्या मित्राला आधार देणे होय. आज जर स्नेह कुणी म्हटलं फक्त नात्या गोत्यात स्नेह समजलं जातो परंतु रयत शिक्षण संस्थेच्या स्नेह छत्राखाली संस्कारित शिक्षण घेतलेले A. S. C महाविद्यालय फुंडे टी वाय बी एस सी बॅच रसायन शास्त्र व प्राणी शास्त्र बॅच 2000–2001 चे तब्बल 24 वर्षानंतर स्नेहमिलन कोप्रोली येथील फार्म हाऊस वर नित्यनियमाने रविवारी झाले स्नेहमिलन म्हणजे योगायोग होय. या स्नेहमिलंनात प्रत्येक मित्र मैत्रिणीने सहभाग घेतला. आपल्या जुन्या आठवणी ह्या जाग्या केल्या तत्कालीन शिक्षक या विषयी स्नेहभाव अर्पण करत आपल्या गुरुवर्य यांनी चांगलं मार्गदर्शन केले. यामुळे आपण सामाजिक स्तरावर चांगल्या आदर्श सहित आपला जिवन प्रवास एक सफल उद्देशाने करत असतो. सद्य काळात आपल्यात हयात नसलेल्या वंदनीय गुरुवर्य रसायन शास्त्र शिक्षक कैलासवासी रोकडे सर व तसेच बॅच चे विद्यार्थी दिनेश म्हात्रे व गैनीनाथ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली तसेच सदर दिवस हा खूप महत्वचा होता. म्हणून प्रत्येकाने आपल्या बॅच विषयी मनोगत व्यक्त करण्यात आली मनोगतात अनेक नवीन जुन्या आठवणी यांना उजाळा मिळाला व प्रत्येक मित्र कोणत्या क्षेत्रात सद्या कार्यरत आहे हे समजले व



आपण महाविद्यालयिन जीवनात केलेल्या मौज मजा या यात सादर केल्या. तसेच विविध प्रकारचे मनोरंजक म्हणजे नृत्य असेल किंवा गीत गायन असेल किंवा नृत्य कला आविष्कार असेल असे विविध उपक्रम घेण्यात आले एकत्र येऊन जी मजा अनुभवतो ती निराळी असते तसेच या स्नेहमिलन यात बॅच तर्फे एक विशेष लकी ड्रा आयोजित करण्यात आला यात विज्येत्याना सन ग्लास गॉगल भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यात विजेते व्यंकटेश , व कल्पना ठाकूर हे ठरले एक अभिनव् उपक्रम म्हणूण बॅचचे सदस्य चेतन म्हात्रे व आरती मोहोकर यांच्या सौजन्याने बॅच चा लोगो असणारा एक किचैन हा प्रत्तेक ग्रुप सदस्य यांना भेट देण्यात आला हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी टी वाय बी एस सी बॅच 2000–2001 च्या सर्वच ग्रुप सदस्य यांनी कमालीची मेहनत घेतली. प्रत्येक ग्रुप सदस्य यांच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद होता. अमित मुंबईकर याने अप्रतिम बासरी वादन करीत सर्वांची मने जिंकली अश्या प्रकारे तब्बल 24 वर्षांनी टी वाय बी एस्सी बॅच रसायनं शास्त्र व प्राणिशास्त्र चा स्नेहमिलन मेळावा पार पडला.

===================

# जिल्हास्तरीय बाल नाटिका स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी 3 नाटीकांचे सादरीकरण

दैनिक युवक आधार
**निफाड प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी/निफाड**–न्या. रानडे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त आणि वैनतेय विद्यालयाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त वैनतेय विद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय बाल नाट्य स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी विविध विषयावर 3 बाल नाटिका सादर करण्यात आल्या. जिल्हास्तरीय बाल नाट्य स्पर्धा दिनांक १९ जानेवारी ते 21 जानेवारी असे तीन दिवस संपन्न होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या बालनाट्य स्पर्धेचे उद्घाटन,अड अंजली पाटील यांनी केले दुसऱ्या दिवसाच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अड दिलीप वाघवकर, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि .दा. व्यवहारे संस्थेचे विश्वस्त मधुकर राऊत, विश्वास कराड , कल्याणी नागरी महिला सहकारी पतसंस्थेच्या संस्थापक अड अंजली पाटील, लता कराड, निलिमा मोडक, संध्या ठाकरे , प्राचार्या स्वाती वाळेकर , प्राचार्य बी .आर .सोनवणे, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी .बी. ,गुंजाळ,प्राचार्या पल्लवी सानप, आदी मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते न्या रानडे, सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बी .आर .सोनवणे यांनी केले याप्रसंगी एड अंजली पाटील ,अड दिलीप वाघवकर, संध्या ठाकरे , स्वाती वाळेकर आदी मान्यवरांची भाषणे झाली शनिवारी अचल, कोरड्या गाभाऱ्याची कहाणी , विठू माझा लेकुरवाळा या 3 बालनाटिका सादर करण्यात आल्या. सोमवारी संपन्न झालेल्या नाटिकांचे परीक्षण स्वप्ना विंगळे, चैतन्य गायधनी ,जयदीप पवार यांनी केले या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सुभाष खाटेकर, श्रीमती एम.डी. वाघ, श्रीमती योगिता निगळ , सुधाकर वाघ श्रीमती सरिता पवार व इतर सहकारी परिश्रम घेत आहे. आभार प्रदर्शन पर्यवेक्षक गुलाब टकले तर सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले.




जिल्हास्तरीय बाल नाट्य स्पर्धेत बालनाटिका सादर करताना बालकलाकार

# तीन वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार उरण हादरले

दैनिक युवक आधार
**महाराष्ट्र प्रतीनिधी/प्रदीप पाटील**–यशश्री शिंदे कांडा मधून उरणकर सावरतात तोच उरण मोरा फड न.5 मध्ये वास्तव्यास असणाऱ्या 3 वर्षाच्या चिमुरडीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याच्या घटनेने संपूर्ण उरण हादरून गेले आहे. लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी उरणच्या नागरिकांमधून होत असून सदरची घटना उरण मोरा येथील फड न.5 मोहन स्टोर,सिंडीकेट बँकेच्या जवळील डोंगरावर असणाऱ्या झोपडपट्टी परिसरात घडली आहे.या कामी मुलीच्या आईने मोर सागरी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली असून फिर्यादीत तिने म्हटले आहे.माझे पती, अनुक्रमे 10 व 9 वर्षाची दोन मुले 3 वर्षाची मुलगी व सासरे असा परिवार एकत्रितपणे राहतो 13 जानेवारीस मी मुलीला शेजारच्या आंगणवाडीत सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास सोडली व दुपारी 1 वाजता तिला घरी आणली असल्याचे तिने आपल्या फिर्यादी मध्ये नोदविले आहे.त्यानंतर आई घरातील आई कपडे धुण्याघरात गेली परंतु मुलगी अंगणात खेळण्यासाठी जाण्या करिता रडू लागलीती बाहेर जाऊ नये म्हणून दाराला प्लॅउड लाऊन अडकून ठेवले मुलगी जोरजोरात का रडते त्यामुळे त्यांचा शेजारी राहणारा दिनेश नितेकर(50)हा तेथे आला व मुलगी रडण्याचे कारण त्यांनी विचारले व मुलीला त्यांनी खेळण्या साठी अंगणात सोडले काही वेळात आई काम आटोपून आली अंगणात मुलगी दिसत नाही पाहून तिने दिनेश नितेकर याल मुली संदर्भात विचारण केली असता मुलगी गल्लीत खेळत असल्याचे त्यांनी सांगितले आईने गल्लीत शोध घेतला परंतु मुलगी दिसत नसल्याने तिने दिनेश नितेकर यास पुन्हा विचारणा केली असता मुलगी संडासाच्या दरवाज्य जवळ असल्याचे तो म्हणाला,आई मुलीला आणण्या साठी गेली असता मुलगी घाबरून आईला बिलगून जोरजोरात रडू लागली आईने उचलून तिला घरी आणले तिला ताप भरला म्हणून उरण मधील अभिनव चाईल्ड केअर क्लिनिक मध्ये नेले असता तेथी डॉ.अजय कोळी यानी तापासून औषध देऊन घरी जाण्यास सांगितले परंतु तीन दिवसा नंतरही ताप उतरला नाही आणि मुलीने दिनेश ककाने शूच्या जागी हात लावल्याचे सांगितले,त्यामुळे मुलीला उरण मघील गाडे हॉस्पिटल मघे नेले असता डॉ.प्रीती गाडे यांनी तिची पूर्ण तपासणी करून गुप्तअंगावर जखमा असल्याचे लेखी पत्रच आईच्या हातात दिल्याने आईच्या पाया खालची वाळू सरकली तिने थेट मोर सागरी पोलीस ठाणे गाठून या बाबत दिनेश निवेतकर यांच्या विरोधात फिर्याद नोंदविली.आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. त्या अनुषगाने दिनेश निवेतकर याच्यावर मोरा सागरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 कलाम 62(2), बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण आधी नियम 2012 कलम–4 बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण आधी नियम 2012 कलम–6 प्रमाणे गुंन्हादाखल करण्यात अला आहे विद्यमान स्थितीत संशयीत अरोपी दिनेश निवेतकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे या संदर्भात मोरा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

===================

# रेवदंड्यात मुंबईच्या सीमाशुल्क विभागाची डिझेल तस्करांवर बेधडक कारवाई



दैनिक युवक आधार
**निलेश फुंडे रेवदंडा**-रेवदंड्यात डिझेल तस्करी करणाऱ्यांवर सीमा शुल्क (कस्टम) मुंबई यांनी जोरदार करवाई करत पाच डिझेल टॅंकर, एक टॅंकर पळून जाण्यात यशस्वी झाला.त्यात दोन भरलेले डिझेल मोठ्या बोटी दोन्ही मिळून सुमारे हजारो लिटर व लाखो करोडो रूपयाचा डीझेल पकडलं ड्रायव्हर व कामगार पकडले आहेत त्यांना पकडून सीमा (कस्टम) शुल्क विभाग मुंबई येथे रीतसर कारवाई करण्यासाठी पकडून घेवून गेले एका बोटीच नाव जय धन लक्ष्मी, व दुसऱ्या बोटीच नाव कुलदैवत साई खंडोबा दोन्ही बोटी अलिबाग तालुक्यातील रेवस इथल्या आहेत रायगड कोकण किनारपट्टीवर जेवढ्या डिझेल तस्करी झाल्या त्यासाठी रेवस च्या बोटी आढळून आलेल्या आहेत. भर समुद्रातून मोठ्या जहाजातून ह्या बोटीमध्ये एका बोटीची क्षमता पन्नास हजार लिटर डिझेल अशा दोन बोटी मिळून सुमारे एक लाख टन डिझेल रेवदंडा ब्रीजच्या खाली जेटीवर आणतात डिझेल आणणारे स्थानिक अलिबाग तालुक्यातील चौल– आग्राव रहिवाशी आहेत. ह्या दोन्ही तस्करांचे रायगड महसूल खातं व रेवदंडा रायगड पोलीस खातं यांचे आर्थिक देवाण–घेवाण होत असते अशी रेवदंडा चौल ग्रामस्थांमध्ये जोरदार चर्चा आहे आजपर्यंत पैशाच्या जोरावर यांच्यावर कधी कारवाई झाली नाही कारण यांचे पुढाऱ्यांसोबत उठ बस असते त्यांच्या जीवावर हे मोठ रॅकेट चालवत असतात अनेक वेळा जनतेने तक्रार केल्या असून पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही उलट तक्रारदारांच नाव या डिझेल तस्करांना सांगितले जाते ग्रामस्थ घाबरून तक्रार देत नाही. पैशाच्या हवासापोटी डिझेल तस्करी करण्याच्या नादात रेवदंडा खाडीमार्गे घुसखोरी होऊ शकते यावर महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार कुठली कायदेशीर सरकारी कारवाई करणार याकडे ग्रामस्थांचं लक्ष लागलं आहे.

=======================

# गुरुकुल प्रिस्कूलने साजरा केला मोठ्या उत्साहात वार्षिक महोत्सव समारंभ!

दैनिक युवक आधार
**जिल्हा प्रतिनिधी/प्रमुख/एम.डी. भोईर**– गुरुकुल प्रिस्कूलमध्ये आपल्या मुलांच्या विकासाला उत्तेजन देण्यासाठी दरवर्षी प्रमाणित वार्षिक महोत्सव साजरा केला जातो. या वर्षीचा महोत्सव विविध रंगारंग कार्यक्रमांनी आणि अविस्मरणीय प्रदर्शनांनी भरलेला होता.मुलांनी नृत्य, गाणी, नाटक आणि इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतला आणि त्यांच्या अद्वितीय कलागुणांचे प्रदर्शन केले. पालकांची उपस्थिती आणि त्यांचा प्रोत्साहन यामुळे या कार्यक्रमास एक वेगळीच उंची मिळाली.प्रोफेशनल शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली, मुलांनी कार्यक्रमात दिलेल्या परफॉर्मन्सने सर्वांचे मन जिंकले. ह्या खास दिनानिमित्त मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाची पायरी चढली आहे. गुरुकुल प्रिस्कूलच्या वार्षिक महोत्सवाचे यशस्वी आयोजन आणि सहभागी विद्यार्थ्यांना सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गुरुकुल प्रिस्कूलच्या प्रिन्सिपल मा. दिपश्री म्हात्रे नाखवा, श्री. जगदीश नाखवा, सौ. सुरेखा नाखवा. श्री. निखिल नाखवा तसेच श्री अशोक म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

===============



# रात्र शाळेतील मुलांना बालगीतांची मेजवानी

दैनिक युवक आधार
**वार्ताहर**–काव्ययोग काव्य संस्था पुणे आयोजित "बालगीत कार्यशाळेचे आयोजन केले होते.हे आयोजन अश्विनी फुटपाथ रात्र शाळा कात्रज येथे करण्यात आले होते.त्यात मार्गदर्शन मा.सौ.वसुधा नाईक सुप्रसिद्ध कवयित्री यांनी आपल्या स्वरचित बालगीतातून अक्षर ओळख करून दिली,मुलांकडून बालगीत म्हणून घेतले.मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.तसेच मा. सारिका सासवडे यांनी आपल्या स्वरचित बालगीतातून मुलांना अंक ओळख करून दिली.या वेळी सौ.वसुधा नाईक यांनी सांगितले,की या फुटपाथ शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकणे ,शिकवणे गरजेचे आहे. म्हणजे आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे,त्या साठी केलेला हा उपक्रम मराठी भाषेसाठी आदर्श ठरेल. काव्ययोग काव्य संस्था पुणे अध्यक्ष मा.योगेश हरणे यांनी सांगितले हा उपक्रम घेण्या मागचा उद्देश असा आहे की, मुलांचे शब्द भांडार समृध्द व्हावे या साठी केलेला हा पहिला उपक्रम यशस्वी रित्या पार पडला.या उपक्रमाचे आयोजन गौरव पुंडे,गौरी महाजन यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी झाला. मुलांना खाऊ वाटला. बक्षीस दिले. कार्यक्रमाचा समारोप शैक्षणिक आरोळी देऊन केला.

